**नि.फौ.ख.क्र.१८७/२०२३**

**रतनसिंग विरुध्द शासन**

**<u>निशाणी क्र. ५ वर आदेश</u>**

०१. अर्जदार रतनसिंग चतुरसिंग चव्हाण, वयः ७० वर्षे, धंदाः व्यापर रा. स्टेशन रोड वसमत याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४५१ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, पोलीस स्टेशन हट्टा यांनी हिरो होंडा कंपनीची स्पलेंडर या मॉडेलची काळ्या रंगाची मोटार सायकल गु.र.क्र ४८५/२०२२ मध्ये जप्त केली असून सदर वाहनाचा नोंदणी क्र.एमएच–३८/ए–१९७९ चेसीस क्र.02G20F17335 इंजिन क्रं. 02G18E16222 असा आहे. प्रस्तुत अर्जान्वये अर्जदार याने सदर जप्त वाहनाचा तात्पुरता ताबा मिळावा अशी विनंती केली आहे.

०२. तपासीक अंमलदार यांनी आपले म्हणणे नि.क्र. १० वर दाखल करून असे कथन केले आहे की, सदर गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असुन मोटार सायकल अर्जदारास परत केल्यास यापुढेही नमुद मोटार सायकलाचा वापर करुन गुन्हा करु शकतो किंवा मोटार सायकल विकुन पुरावा नष्ट करु शकतो त्यामुळे तपासीक अमंलदार यांनी अर्जदारास मोटार सायकल देण्यात येऊ नये अशी विनंती केली आहे. सरकारी वकीलांनी आपले म्हणणे नि.क्र.१ च्या मागील पानावर दाखल करुन प्रस्तुतचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असुन जप्त वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास तो त्याचे स्वरप बदलेल या कारणास्तव सरकारी वकीलांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. गुन्हयातील मुद्येमाल वर नमुद वाहन हे गु.र.क्र. ४८५/२०२२ मध्ये जप्त आहे व पोलीस स्टेशन हट्टा यांच्या ताब्यात आहे ही बाब वादातील नाही. सदर वाहन अर्जदार यांच्या मालकीचे असल्याबाबत अर्जदाराने स्वत:चे शपथपत्र नि.क्र. ६ वर दाखल केले आहे, तसेच वाहन खरेदी बाबतचे आर.सी.बुक व त्यांच्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच, आरोपीने नि.क्र.११ कडे पुरसीस दाखल करुन जप्त वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्यास त्याचे काहीऐक हरकत नसल्याचे कथन केले आहे. सबब, अभिलेखावरुन प्रथमदर्शनी असे दिसते की, अर्जदार हा प्रस्तुत वाहनाचा मालक आहे.

०४. पटलावरील पुराव्यावरुन दिसुन येते की, अर्जदाराने जप्त वाहनाचे मालक व ताबेदार असल्याचे प्रथमदर्शनी दाखवुन दिले आहे. तसेच अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही सदर वाहनाचा ताबा मागितला नाही. तसेच गुन्हाचे स्वरुप व जप्त वाहनाचा गुन्हामधील वापर पाहता ते न्यायालयात सदर खटल्याचे वेळी हजर केल्याने अभियोगपक्षाचे पुराव्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार आहे असे दिसुन येत नाही. तसेच तपासिक अमंलदार यांनी प्रस्तुतचे वाहन यापूर्वी अशाच प्रकारच्या गुन्हयात वापरल्याचे अथवा वाहनाविरुध्द कोणतीही कार्यवाही प्रलंबित आहे असे कोणतेही कथन त्यांच्या म्हणण्यामध्ये केलेले नाही. जवळच्या काळात सदरचे प्रकरण लवकर निकाली निघणार नाही. त्यामुळे जप्त वाहन पोलीस स्टेशनमध्ये विनाकारण पडून राहिल्यास ते खराब होण्याची शक्यता

नाकारता येत नाही. म्हणुन अर्जदारास काही अटी व शर्ती घालुन देवुन जप्त वाहनाचा तात्पुरता ताबा दिल्यास न्यायाची बाजु सांभाळली जावु शकते. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. पोलीस स्टेशन हट्टा येथे नोंद झालेल्या गु.र.क्र.४८५/२०२२ मधील तपासी अंमलदारास आदेशीत करण्यात येते की, प्रकरणातील जप्त वाहन हिरो होंडा कंपनीची स्पलेंडर या मॉडेलची काळ्या रंगाची मोटार सायकल ज्याचा नोंदणी क्र.एमएच–३८/ए–१९७९ चेसीस क्र. 02G20F17335 इंजिन क्रं. 02G18E16222 असा आहे ते वाहन अर्जदार यांना रक्कम रुपये ७०,०००/– (रुपये सत्तर हजार केवळ) च्या हमीपत्रावर व बंधपत्रावर तात्पुरता ताबा म्हणुन देणेत यावे.

०३. अर्जदाराने सदरचे जप्त वाहन इतर कोणत्याही गुन्हयात वापरु नये व कोणालाही वापरण्याची परवानगी देवु नये.

०४. अर्जदाराने सदरच्या वाहनामध्ये कोणताही बदल करु नये व न्यायालयाच्या परवानगी शिवाय कुणालाही विकू नये अथवा त्यावर ति–हाईत इसमाचे हक्क व अधिकार निर्माण करु नये.

०५. तपासी अंमलदाराने किंवा न्यायालयाने आदेश केल्यास अर्जदाराने सदर वाहन हजर करावे.

०६. सदर वाहन अर्जदारास ताब्यात देतांना त्याचा रितसर पंचनामा करावा व दोन फोटो प्रत्येक बाजुने अर्जदाराच्या खर्चाने घ्यावेत.

०७. सदरचा पंचनामा, फोटो व बंधपत्र तपासिक अंमलदार याने न्यायालयात प्रस्तुतकामी दाखल करावे.

०८. या अर्जाची पुर्तता तपासी अंमलदारासमक्ष करावी. तसेच, तपासीक अंमलदाराने त्याबाबतचा अहवाल न्यायालयात दाखल करावा.

०९. अर्जदाराने या आदेशाची पुर्ततेकामी तपासीक अंमलदार यांना जप्त वाहनासंबंधीत मालकीच्या कागदपत्राची व वाहनाच्या विमाच्या कागदपत्राची प्रत द्यावी.

स्वाक्षरित/–

दिनांक :–०८/०८/२०२४ **(एस.जे.चिवटे)**

ठिकाण :– वसमत. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी(न्यायालय क्र.०२) वसमत.